# पत्रकारदिनी फोंडा पत्रकार संघाचा 38 वा वर्धापनदिन

दिनांक ङ्ग 30 जुलय 2019

फोंडा पत्रकार संघाचा 38 वा वर्धापनदिन आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या 98 व्या पुण्यतिथी प्रित्यर्थ फोंडा पत्रकार संघ आणी अंत्रृज पत्रकार संघ, फोंडा यांच्या संयूक्त विद्यमाने दि. 1 ऑगस्ट 2019 रोजी पत्रकादिन साजरा करण्यात येणार आहे.

फोंडा नगरपालिका सभागृहामध्ये संध्या. 5.30 वा. होणा-या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी मुख्यमंत्री आणि आमदार श्री. रवी नाईक उपस्थित असतील. तर फोंडा नगरपालिकेचे नगराध्यक्ष श्री. प्रदीप नाईक कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भुषवतील. खास निमंत्रीत पाहूणे म्हणून फोंडा नगरपालीकेचे उपनगराध्यक्ष श्री. विश्वऩाथ दळवी आणि नगरसेवक श्री. व्यंकटेश ए. नाईक उपस्थित असतील.

या दिनानिमि-त यंदा गोवा सरकारच्या माहिती आणि प्रसिध्दी संचालनालयात वृ-त अनुवादक पदी गेली 26 वर्षे उत्तम सेवा बजावणारे शिरोड्याचे सुपुत्र श्री. विष्णू मंगेश गांवकार व गोव्यातील दैनिकांतून सातत्याने पत्रलेखन करणारे उसगांव येथील मधुसूधन देसाई यांचा मान्यवरांहस्ते सन्मान केला जाणार आहे. तरी सर्व पत्रकार मित्र व साहित्यीकांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावावी.

--
DIRECTORATE OF INFORMATION AND PUBLICITY.
THIRD FLOOR,UDYOG BHAVAN,
NEAR AZAD MAIDAN, PANAJI GOA